देशदूत यूट्युब चॅनलसाठी क्यूआर कोड स्कॅन करा
YouTube
www.deshdoot.com

शिल्पकार विकासाचा...
# देशदूत





इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक ३२६ । शनिवार, दि. २ ऑगस्ट २०२५ । पाने १२ | किंमत ₹ ५




**आतील पानात**

संपादकीय
खड्ड्यांचे उत्तरदायित्व कोणाचे?

पडसाद
उथळ पाण्याला खळखळाट फार

**शेवटचे पान**
अहिल्यानगरात बनावट नोटांचे रॅकेट उघडकीस



# मतचोरीत निवडणूक आयोगच भागीदार : राहुल

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू आहे. मतदार याद्यांमध्ये बोगस मतदार आढळून आल्यानंतर आयोगाने मतदार यादी पुनर्परीक्षणाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यावर विरोधी पक्षांकडून शंका व्यक्त करत आरोप केले जात असून, आता राहुल गांधींनी थेट मतांची चोरी होत असून, निवडणूक आयोगच त्यात भागीदार असल्याचे म्हटले आहे. या आरोपांना आयोगानेही प्रत्युत्तर दिले आहे.

संसद भवन परिसरात मीडियाशी बोलताना राहुल गांधी म्हणाले, आम्हाला मध्य प्रदेशात शंका होती. लोकसभा निवडणुकीतही शंका होती. महाराष्ट्रातील निवडणुकीदरम्यान आमची शंका आणखी वाढली. आम्हाला संशय होता की, राज्य पातळीवर एक कोटी मतदार जोडले गेले आहेत. आम्ही तपशिलात गेलो, मात्र निवडणूक आयोगाने मदत केली नाही. आम्ही स्वतःहून चौकशी केली. त्याला सहा महिने लागले. पण आम्हाला जे सापडले आहे ते अणुबॉम्बसारखे आहे. हे जर फुटले तर तुम्हाला भारतात कुठेही निवडणूक आयोग दिसणार नाही. निवडणूक आयोगातील जो कोणी हे काम करत आहे. वरपासून खालपर्यंत...आम्ही तुम्हाला सोडणार नाही. तुम्ही भारताविरुद्ध काम करत आहात, हा देशद्रोह आहे. तुम्ही कुठेही असाल, निवृत्त व्हा, कुठेही जा...आम्ही तुम्हाला शोधून काढू, असा इशाराही राहुल गांधी यांनी यावेळी दिला.

### आयोगाचे उत्तर

केंद्रीय निवडणूक आयोगाने मौन सोडत राहुल गांधींनी केलेल्या आरोपांवर भूमिका मांडली. केंद्रीय निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, दररोज केल्या जात असलेल्या निराधार आरोपांकडे आयोग दुर्लक्ष करतो. दररोज धमक्या दिल्या जात असतानाही निष्पक्ष आणि पारदर्शकपणे काम करत असलेल्या सर्व निवडणूक कर्मचाऱ्यांनी अशा बेजबाबदार विधानांकडे लक्ष देऊ नये.

## थोडक्यात

### उपराष्ट्रपतिपदाची ९ सप्टेंबरला निवड

**नवी दिल्ली ।** उपराष्ट्रपती पदासाठी ९ सप्टेंबरला निवडणूक होणार आहे. या पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख २१ ऑगस्ट आहे. इंडिया आघाडीने यापूर्वी उपराष्ट्रपतिपदाची मागणी केली होती. त्यामुळे आता इंडिया आघाडीकडून उपराष्ट्रपतिपदासाठी उमेदवार दिला जाणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### कंगनाला धक्का

**मंडी ।** येथील भाजप खासदार आणि चित्रपट अभिनेत्री कंगना राणावत हिला पंजाब-हरयाणा उच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. न्यायालयाने तिच्याविरुद्धचा मानहानीचा दावा रद्द करण्याची याचिका फेटाळून लावली आहे. हे प्रकरण २०२१ चे आहे, जेव्हा शेतकरी आंदोलन सुरू होते. त्याकाळात कंगनाने केलेल्या पोस्टवरून ती अडचणीत आली होती.

### अनिल अंबानींना समन्स

**मुंबई ।** सक्तवसुली संचालनालयाने अनिल अंबानी यांना मोठ्या कर्ज घोटाळ्याच्या चौकशीसाठी समन्स बजावले आहे. हा कथित घोटाळा सुमारे १७ हजार कोटी रुपयांचा असल्याचे म्हटले जात आहे. अनिल अंबानी यांना ५ ऑगस्ट रोजी दिल्लीतील ईडी मुख्यालयात चौकशीसाठी हजर राहण्यास सांगण्यात आले आहे.

## शेअर बाजार

सेन्सेक्स : ८०६०० (-५८६)
निफ्टी : २४५६५ (-२०३)

## सोने-चांदी

| सोने (प्रति १० ग्रॅम) | |
|---|---|
| २४ कॅरेट | ९८,००० |
| २२ कॅरेट | ९०,१६० |
| चांदी (प्रतिकिलो) | |
| १११००० | |

## तापमान

किमान : २२.०°
कमाल : २७.४

## कांदा भाव



किमान : ५००
कमाल : १७००
सरासरी : १३१०

## मिश्किली




# द्विपक्षीय संबंध गुणवत्तेवर

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्यावर भारताचे सडेतोड उत्तर

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तानमध्ये झालेला युद्धविराम आणि रखडलेल्या व्यापार कराराच्या मुद्यावरून सध्या भारत आणि अमेरिकेतील संबंध कमालीचे तणावपूर्ण बनलेले आहेत. त्यातच डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा करत भारत आणि रशियाच्या अर्थव्यवस्थेवर टीका केली. विविध देशांबरोबरचे द्विपक्षीय संबंध स्वत: च्या गुणवत्तेवर आधारित आहेत. त्या संबंधांना कोणत्याही तिसऱ्या देशाच्या नगरेतून पाहू नये, अशा शब्दात डोनाल्ड ट्रम्प यांना भारताने सडेतोड उत्तर दिले आहे.

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी भारतावर अमेरिकेन टॅरिफचा परिणाम आणि भारत-रशिया संबंधाबाबत भाष्य केले. ते म्हणाले, डोनाल्ड ट्रम्प यांच्या २५ टक्के टॅरिफचा भारतावर काही खास प्रभाव पडणार नाही. भारत शेतकरी, डेअरी आणि एमएसएमईबाबत कुठलीही तडजोड केली जाण्याची शक्यता नाही. तसेच संशोधित पिकांच्या आयातीलाही परवानगी दिली जाण्याचीही कुठलीही शक्यता नाही. स्पष्टच शब्दात सांगायचे तर अमेरिका ज्या विभागांवरील टॅरिफ कमी करण्यासाठी भारतावर वारंवार टॅरिफ आणि अन्य निर्बंधांच्या माध्यमातून दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहे त्या विभागातील बाजार कुणासाठी खुला करण्यास भारत राजी नाही. २५ टक्के टॅरिफचा प्रभाव किरकोळ आहे.



### भारत-रशिया एकमेकांच्या बाजूने

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, भारत आणि रशिया हे स्थिर भागीदार असून, वेळोवेळी एकमेकांच्या बाजूने उभे आहेत. आमच्या संरक्षण गरजांची पूर्तता पूर्णपणे आमच्या राष्ट्रीय सुरक्षा आणि धोरणात्मक मूल्यांकनाद्वारे निश्चित केली जाते. भारत-अमेरिका भागीदारीत अनेक बदल आणि आव्हाने आली आहेत. आम्ही अमेरिकेसोबत ज्या ठोस अजेंड्यावर वचनबद्ध आहोत, त्यावर लक्ष केंद्रित करत आहोत. आम्हाला विश्वास आहे की, अमेरिकेसोबतचे आमचे संबंध पुढे जात राहतील.

### निर्णय लांबणीवर

डोनाल्ड ट्रम्प त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळाच्या सुरुवातीपासूनच टॅरिफच्या मुद्यावर आक्रमक आहेत. त्यांनी आतापर्यंत ९२ देशांवर नवीन टॅरिफ लावण्याचा आदेश काढला आहे. याआधी २ एप्रिल रोजी त्यांनी जागतिक स्तरावर टॅरिफ लावण्याची घोषणा केली होती, पण ती ७ दिवसांनी ९० दिवसांसाठी पुढे ढकलली होती. त्यानंतर पुन्हा ३१ जुलैपर्यंत आणि आता ८ ऑगस्टपर्यंत मुदत वाढवण्यात आली आहे.

# यवतमध्ये धुमश्चक्री; जाळपोळ, दगडफेक



**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील यवत गावात दोन गटात शुक्रवारी मोठा राडा झाला. दोन्ही गट आमनेसामने येऊन मोठ्या प्रमाणावर जाळपोळ आणि तोडफोड झाल्याने तणाव निर्माण झाला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या असून, गावात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शांतता राखण्यासाठी यवतमध्ये कलम १४४ लागू करण्यात आले आहे. दरम्यान, येथील पान ८ वर >>>

### आक्षेपार्ह पोस्ट कारणीभूत

पुणे-सोलापूर रस्त्यावर दौंड तालुक्यात यवत गाव आहे. येथील एका मुस्लीम तरुणाने सोशल मीडिया ग्रुपवर केलेली आक्षेपार्ह पोस्ट गावातील वातावरण बिघडवण्यास कारणीभूत ठरल्याची माहिती समोर आली आहे. ही पोस्ट मध्य प्रदेशात घडलेल्या एका घटनेबाबत होती. संबंधित तरुण मूळचा नांदेडचा असून, तो गवंड्याचे काम करत असल्याचे सांगण्यात येते.

# तपास पद्धतीत विसंगती

**मालेगाव बॉम्बस्फोट**

## एटीएस, एनआयएवर न्यायालयाचा ठपका

**मुंबई । प्रतिनिधी**

मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यातील आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करतानाच विशेष सत्र न्यायालयाने केंद्रीय तपास यंत्रणांच्या संघर्षावर तसेच तपास पद्धतीतील विसंगतीवर ठपका ठेवला. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या एटीएस आणि एनआयएने सादर केलेल्या पुराव्यात विरोधाभास असून ते विश्वासार्ह नसल्याने आरोपींना निर्दोष सोडण्यात येत असल्याचे न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी निकालपत्रात स्पष्ट केले.

मालेगाव बॉम्बस्फोट खटल्याचा निकाल गुरुवारी न्यायालयाने जाहीर केला. त्यावेळी न्यायालयाने या खटल्यातील आरोपी असलेल्या भाजपच्या माजी खासदार प्रज्ञासिंह ठाकूर, कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह सात आरोपींची निर्दोष सुटका केली. या खटल्याच्या १०३७ पानी निकालाची प्रत शुक्रवारी (दि.१) उपलब्ध झाली.

न्यायालयाने आरोपींची निर्दोष मुक्तता करताना महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथक (एटीएस) आणि राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) यांच्यातील सुरू असलेल्या संघर्षावर प्रकाश टाकला तसेच त्यांच्या तपासात विरोधाभास पान ८ वर >>>

# लाच स्वीकारताना लिपिक जाळ्यात

**कळवण । प्रतिनिधी**

येथील भूमी अभिलेख कार्यालयातील लिपिकाला तीन हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले.

विजय हनुमंत गवळी (४३, रा. नम्रता रो हाऊस नं. ४, वरदनगर, म्हसरूळ, नाशिक) असे लिपिकाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, तक्रारदाराने पान ८ वर >>>

# वसुली भोवली; चौघे आरसीपीत

**नाशिक। प्रतिनिधी**

विविध पोलीस ठाण्यांत 'विशेष' जबाबदारी पार पाडणाऱ्या चौघांना पोलीस आयुक्तांनी दणका दिला आहे. चार कलेक्टरांसह अन्य एका गोपनीय कर्मचाऱ्यास दंगल नियंत्रण पथकात धाडण्यात आले आहे. अवैध धंद्यांवरील कलेक्शनमधून ठराविक कर्मचाऱ्यांचे आपापसात 'राडे' सुरू झाल्याचे गेल्या चार दिवसांपूर्वी उघड झालेल्या बदलीकांडाच्या प्रकरणानंतर समोर आले आहे. संबंधित कर्मचाऱ्यांसह शहरातील दोन अधिकाऱ्यांमागे आता खात्यांतर्गत चौकशी सुरू झाली आहे. पान ८ वर >>>

### खंडणीमागील गमक


'कलेक्शन'च्या मुद्यावरून वादात असलेल्या तिघांपैकी एका कर्मचाऱ्याविरुद्ध दोन वर्षांपूर्वी विधानसभेत हिवाळी अधिवेशनात एका आमदारांनी तक्रार केली होती. तर दुसरा कर्मचारी काही महिन्यांपूर्वी पोलीस ठाण्यात नियुक्त झाला असून, त्याने तेथील 'कलेक्टर'ला बाजूला करत स्वत: सूत्रे हाती घेतल्याची चर्चा आहे. कर्मचाऱ्यांमधील आपापसातील वाद आणि अधिकाऱ्याची 'मलईदार' पदाच्या नियुक्तीची हौस हे खंडणी प्रकरणामागील गमक असल्याचे पोलीस दलात ऐकू येत आहे.

# 'श्यामची आई' सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट

## राष्ट्रीय पुरस्कार : किंग खान प्रथमच सर्वोत्कृष्ट अभिनेता

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

चित्रपट क्षेत्रात मानाच्या समजल्या जाणाऱ्या ७१ व्या राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. शाहरुख खानला 'जवान' चित्रपटासाठी आणि विक्रांत मेस्सीला '१२ फेल' या चित्रपटासाठी संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा तर अभिनेत्री राणी मुखर्जीला 'मिसेस चॅटर्जी वर्सेस नॉर्वे' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट म्हणून श्यामची पान ८ वर >>>







### मराठीचा झेंडा

७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये मराठी सिनेसृष्टीने आपला वेगळा ठसा उमटवण्यात यश मिळवले.

- सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (आत्मपॅम्फ्लेट) : आशिष बेंडे
- सर्वोत्कृष्ट बालचित्रपट : नाळ २
- सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट : श्यामची आई
- सर्वोत्कृष्ट बालकलाकार (नाळ २, जिप्सी) : त्रिशा ठोसर, श्रीनिवास पोकळे आणि भार्गव जगताप, कबीर खंदारे

# वादग्रस्त मंत्र्यांना वाचवण्यात शिंदे यशस्वी

**मुंबई । प्रतिनिधी**

विधिमंडळ अधिवेशनाच्या दरम्यान माणिकराव कोकाटे यांच्याइतकेच वादग्रस्त ठरूनही सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम या दोघांना संभाव्य कारवाईपासून वाचवण्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तूर्त यशस्वी ठरले आहेत. शिंदे यांनी दोन दिवसांपूर्वीच्या दिल्ली भेटीत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेऊन मंत्र्यांची बाजू मांडून त्यांना अभय मिळवून दिल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे कोकाटे यांच्याप्रमाणे शिरसाट आणि कदम यांच्यावर कारवाई होऊ शकली नाही, अशी माहिती सूत्रांनी दिली.

विधान परिषदेत मोबाईलवर रमीचा डाव मांडल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे मंत्री माणिकराव कोकाटे अडचणीत सापडले होते. त्याचवेळी शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांच्या घरातील खोलीत पैशांनी भरलेल्या कथित बॅगांचा व्हिडिओ समाज माध्यमांत व्हायरल झाला होता.

नाशिक ■ नाशिक ■ जळगाव ■ धुळे ■ नंदुरबार ■ अहमदनगर येथून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित
www.facebook.com/deshdoot
cmyk